राज्यातील अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रात
क्षेत्र विकास कार्यक्रम राबविण्यासाठी अनुदान
वितरित करण्यास मंजुरी बाबत. सन २०१७-१८.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्यांक विकास विभाग,
शासन निर्णय क्रमांक : क्षेविका-२०१८ /प्र.क्र.२७ /का.९,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दि. ३१ मार्च , २०१८

संदर्भ :- १) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्षेविका-२०१५/प्र.क्र.७६/का.९, दि. १८ जून, २०१५
२) शासन पूरकपत्र, अल्पसंख्याक विकास विभाग, क्षेविका-२०१५/प्र.क्र.५/का.९, दि. ९ मार्च, २०१६.
३) शासन परिपत्रक, वित्त विभाग , क्र. अर्थसं - २०१७ / प्र.क्र. ७५/अर्थ-३, दि. १८ एप्रिल, २०१७.
४) शासन परिपत्रक, वित्त विभाग , क्र. अर्थसं - २०१७ / प्र.क्र. ९४/अर्थ-३, दि. ३० जून, २०१७.
५) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्षेविका-२०१७/प्र.क्र.१०२ /का.९, दि. ३० नोव्हेंबर, २०१७.
६) शासन परिपत्रक, वित्त विभाग,क्र. अर्थसं - २०१७/प्र.क्र. ७५/अर्थ-३,दि. ०६ फेब्रुवारी,२०१८.
७) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र. क्षेविका-२०१८/प्र.क्र.५ /का.९, दि. १५ फेब्रुवारी,२०१८.

प्रस्तावना :-

अल्पसंख्याक विकास विभागाने सन २००८-०९ या वर्षापासून राज्यातील अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रांकरिता क्षेत्रविकास कार्यक्रम कार्यान्वित केला असून शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र. क्षेविका-२०१५/प्र.क्र.७६/का.९, दि. १८ जून, २०१५ अन्वये ही योजना सन २०१५-१६ या वर्षात राबविण्यास मंजुरी देण्यात आली आहे. तसेच शासन पूरकपत्रक, अल्पसंख्याक विकास विभाग, क्षेविका-२०१५/ प्र.क्र.५/ का.९, दि. ९ मार्च, २०१६ अन्वये उपरोक्त दि. १८ जून, २०१५ रोजीच्या शासन निर्णयातील योजनेची कार्यपध्दती या शीर्षाखाली परिच्छेद (ब) (iii) च्या पुढे परिच्छेद दाखल करण्याचा निर्णय शासन मान्यतेने घेतला आहे. त्यानुसार मा. खासदार , आमदार व जिल्हाधिकारी यांच्याकडून महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपंचायत यांचे प्राप्त प्रस्तावांना मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय :-

सन२०१७-१८या आर्थिक वर्षात नागरी क्षेत्र विकास योजनेकरिता रु.२५,००,००,०००/-(अक्षरी रूपये पंचवीस कोटी फक्त) एवढी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली आहे. संदर्भ क्र. ३ व ४ येथील शासन परिपत्रकान्वये सन२०१७-१८ मध्ये प्रथम नऊ महिन्यांकरिता (डिसेंबर,२०१७अखेर) अर्थसंकल्पित निधीच्या ७० टक्के निधी वितरणास तसेच संदर्भ क्र. ६ अन्वये सन २०१७-१८ मधील अर्थसंकल्पित निधीच्या एकूण वार्षिक तरतूदीच्या (पुरवणी मागण्यांसह) महसूली ७०% व भांडवली ८०% च्या मर्यादेत अर्थसंकल्पीय अंदाज वितरण प्रणालीवर (बीम्स) वितरीत करण्यास सहमती देण्यात आली आहे. त्यानुसार रु.२०,००,००,०००/-(अक्षरी रूपये वीस कोटी फक्त) इतका निधी उपलब्ध झाला असून त्यापैकी संदर्भ क्र. ५ आणि ७ अन्वये सर्व एकूण रु. १७,३६,९५,०११/-(अक्षरी एकूण रुपये सतरा कोटी छत्तीस लक्ष पंचाण्णव हजार अकरा फक्त) इतका निधी वितरित करण्यात आला आहे. त्यापैकी **उर्विरत रु.२,६३,०४,९८९/- (अक्षरी एकूण रुपये दोन कोटी त्रेसष्ट लक्ष चार हजार नवसे एकोणनव्वद फक्त) इतका निधी राज्यातील अल्पसंख्याक बहूल नागरी क्षेत्र विकास योजनेकरिता मार्च,२०१८**

अखेर पर्यंत वितरणास उपलब्ध आहे. सन२०१७-१८या आर्थिक वर्षाकरिता निधी मिळण्यासाठी मा. खासदार, आमदार व जिल्हाधिकारी यांच्या कडून प्राप्त प्रस्तावांना महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपंचायत हद्दीमध्ये कामाच्या प्रस्तावांना शासन मान्यतेने या शासन निर्णयासोबतच्या **परिशिष्ट "अ"** मध्ये दर्शविल्याप्रमाणे क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत एकूण **रु.२,६३,००,०००/- (अक्षरी एकूण रुपये दोन कोटी त्रेसष्ट लक्ष फक्त)** एवढा निधी शासन मान्यतेने मंजूर करण्यात येत आहे. सदर निधी संबधित महानगरपालिका/ नगरपालिका/ नगर पंचायत ज्या जिल्हयांमध्ये स्थित आहेत, त्या जिल्हयांचे जिल्हाधिकारी यांना स्वाधीन करण्यात येत आहे.

२. संबंधित महानगरपालिका / नगरपालिका/ नगरपंचायतींना मंजूर करण्यात आलेले अनुदान वितरित करण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी नियंत्रक अधिकारी आणि आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम पाहतील. **परिशिष्ट "अ"** मध्ये दर्शविलेली कामे इतर योजनेतून करण्यात आलेली नाहीत, याची शहानिशा व खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी व जर सदर काम इतर योजनेतून मंजूर केले असल्यास त्या बदल्यात सदर योजनेतील इतर काम मंजूर निधीच्या मर्यादेत राहून बदल करण्याचे अधिकार संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना राहतील. उपरोक्त कामाच्या बदल्यात सदर योजनेतील इतर काम करणे शक्य नसल्यास त्यासाठी वितरीत केलेला निधी शासनाच्या कोषागारात तात्काळ जमा करण्यात यावा. तसेच संबंधित जिल्हाधिकारी यांनी उपरोक्त कामांचे अंदाजपत्रक बांधकाम विभागाकडून प्राप्त करून घ्यावे. याबाबतची सर्व कागदपत्रे शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार प्राप्त करून घेण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी करावी. त्यानंतर त्यांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात यावी व निधी संबंधित महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपंचायत यांना सुपूर्द करण्यात यावा. तसेच सदर कामे महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपंचायतीच्यां बांधकाम विभागामार्फत रितसर करुन घेण्यात यावीत.

३. राज्यातील महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपंचायतींनी मागणी केल्यानुसार ज्या विवक्षित प्रयोजनासाठी निधि मंजूर करण्यात आला आहे, केवळ त्याच प्रयोजनासाठी संबंधित महानगरपालिका/ नगरपालिका/नगरपंचायतींना निधी खर्ची टाकणे अनिवार्य आहे. संबधित जिल्हाधिकाऱ्यांकडून अनुदान वितरित करण्यात आल्यानंतर संबंधित महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपंचायतींना सहा महिन्यांच्या कालावधीत प्रस्तावात नमूद केलेली कामे पूर्ण करणे आवश्यक आहे व याबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे या शासन निर्णयाच्या **परिशिष्ट "ब"** मध्ये विहित केलेल्या नमुन्यात जिल्हाधिकाऱ्यांनी अल्पसंख्याक विकास विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे. क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत राज्यातील महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपंचायतींनी हाती घेतलेल्या विकासकामांच्या प्रगतीबाबत संनियंत्रण करुन त्याबाबतचा अहवाल संबंधित जिल्हाधिकारी यांनी शासनास सादर करावा.

४. या योजनेंतर्गत होणारा खर्च " मागणी क्र. झेडई-१, मुख्यलेखाशिर्ष २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण ०२ समाजकल्याण २०० इतर कार्यक्रम, राज्य योजनांतर्गत योजना (०१) (०७) अल्पसंख्याक सकेंद्रित क्षेत्रातील क्षेत्र विकास कार्यक्रमाकरिता सहायक अनुदान (२२३५-ए-१३१) ३१ सहायक अनुदान" या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या वर्षाकरिता मंजुर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

५. "सदर शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८ भाग पहिला, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, दि.१७एप्रिल,२०१५ अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त झालेल्या अधिकारांतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार तसेच शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. शासन परिपत्रक, शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं- २०१७/ प्र.क्र.७५/ अर्थ-३, दि.१८ एप्रिल, २०१७, क्र. अर्थसं- २०१७/ प्र.क्र.९४/ अर्थ-३, दि. ३० जून, २०१७ आणि क्र. अर्थसं-

२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३,दि. ०६ फेब्रुवारी,२०१८च्या प्राप्त मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे. ”

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर www.maharashtra.gov.in उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०३३११७४६२५८५१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Dinesh M. Sonavane

Digitally signed by Dinesh M. Sonavane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9cabb099fd0576208f4caa310d2e7860201ab5363a2133e0927ff26c0f016fdf, 2.5.4.45=032100CD9D66225CED8BAE27E0E1249D39EC14A54419D0A13504B49333B23F92B58199, cn=Dinesh M. Sonavane
Date: 2018.03.31 23:02:56 +05'30'

(दि. मा. सोनवणे)
उप सचिव , महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
४. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव सर्व मंत्रालयीन विभाग,
५. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर,
६. महालेखापाल १/२ (लेखापरीक्षा) , मुंबई / नागपूर,
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
९. संबंधित विभागीय आयुक्त,
१०. आयुक्त, नगरपालिका प्रशासन, मुंबई,
११. संबंधित जिल्हाधिकारी,
१२. आयुक्त, संबंधित महानगरपालिका,
१३. मुख्याधिकारी, संबंधित नगरपालिका,
१४. मा.मंत्री / मा.राज्यमंत्री (अल्पसंख्याक विकास) यांचे खाजगी सचिव,
१५. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
१६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय (प्रसिध्दीसाठी),
१७. निवडनस्ती (का-९)

शासन निर्णय ,अल्पसंख्याक विकास विभाग क्र. क्षेविका -२०१८ /प्र.क्र. २७ /का.९,
दि. ३१ मार्च ,२०१८.

परिशिष्ट - "अ"

महाराष्ट्र राज्यातील अल्पसंख्याक बहुलनागरी क्षेत्रांकरिता क्षेत्रविकास कार्यक्रम महानगरपालिका / नगरपालिकांचे जिल्हानिहाय निधी वितरणाचे विवरणपत्र.

अ. क्र	जिल्हा	म.न.पा./ न.पा/नपा	कामांचे नांव	मंजूर निधी (रुपये)
१	**पुणे**	पुणे म.न.पा.	कागदीपुरा कब्रस्थान येथे विविध विकास कामे	१० लक्ष
			प्रभाग क्र.१६ कागदीपुरा परीसरात ड्रेनेज, रस्ते, प्रकाश व्यवस्था विषयक कामे करणे.	१० लक्ष
			प्रभाग क्र.२८ बिबवेवाडी अंतर्गत सॅलसबरी पार्क व यासिन झुक दर्गा येथे हायमास्ट दिवे बसविणे.	२० लक्ष
		दौंड न.प.	नॉर्टन चर्च परिसरात पेव्हिंग ब्लॉक बसविणे	१० लक्ष
			जिल्हा पुणे एकूण रुपये	**५० लक्ष**
२	**मुंबई उपनगर**	मुंबई उपनगर	गोरेगाव मोतीलाल नगर-१, त्रिकोणी मैदान, मस्जिद जवळ सुशोभिकरण व लादीकरण करणे.	३० लक्ष
			बांद्रा टीचर्स कॉलनी येथील मुस्लीम कब्रस्तान येथील प्रार्थनागृहाचे सुशोभीकरण व पुरुषांसाठी असलेल्या शौचालयाचे नुतनीकरण करणे.	१० लक्ष
			गोळीबार (सांताक्रझ पूर्व) येथील मदरसा (शाळा) करीता संरक्षक भिंत बांधणे.	१० लक्ष
			जिल्हा मुंबई उपनगर एकूण रुपये	**५० लक्ष**
३	**बुलडाणा**	बुलडाणा न.प.	प्रभाग क्र.१ मध्ये सुभानखा ले आऊटमध्ये जावेद खान ते समद खान यांच्या घरापर्यंत रस्ता व नाली बांधकाम करणे.	१० लक्ष
			जिल्हा बुलडाणा एकूण रुपये	**१० लक्ष**
४	**ठाणे**	कल्याण डोंबिवली म.न.पा.	प्रभाग ३९ अशोकनगर परिसरात अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण तयार करणे.	१० लक्ष
			जिल्हा ठाणे एकूण रुपये	**१० लक्ष**
५	**नाशिक**	नाशिक मनपा	प्रभाग क्र.३० मधील मदार नगर परिसरातील रस्ते कॉंक्रीटीकरण करणे	१० लक्ष
		कळवण न.पं.	अल्पसंख्याक वस्तीत मुलभूत सुविधा निर्माण करणे.	१० लक्ष
		नाशिक मनपा	म.न.पा हद्दीतील बडीदर्गाह शरीफ येथे संरक्षक भिंत बांधणे	१० लक्ष
			जिल्हा नाशिक एकूण रुपये	**३० लक्ष**
६	**अहमद नगर**	पाथर्डी न.प.	जैन समाजासाठी समाजमंदिर बांधणे	१० लक्ष
		शेवगांव न.प.	ईदगाह मैदान येथे अंतर्गत रस्ते करणे	१० लक्ष
			जिल्हा अहमदनगर एकूण रुपये	**२०लक्ष**

७	**वाशिम**	वाशिम न.प.	प्रभाग क्र.१४ मेहबुब भाई चुडीवाले यांच्या घरापासूनते हुसेन याच्या घरापर्यंत सिमेंट रोड व नाली बांधकाम करणे.	५ लक्ष
			प्रभाग क्र.१४ बुडाभाई चौधरी यांच्या घरापासून ते हिरामांजरे यांच्या घरापर्यंत सिमेंट रोड करणे	५ लक्ष
			जिल्हा वाशिम एकूण रुपये	**१० लक्ष**
८	**यवतमाळ**	उमरखेड न.प.	अल्पसंख्याक वस्तीत मुलभूत सुविधा निर्माण करणे.	१० लक्ष
			जिल्हा यवतमाळ एकूण रुपये	**१० लक्ष**
९	**नंदुरबार**	तळोदा	तळोदा शहरातील शादीखाना बांधकाम करणे	१३ लक्ष
			जिल्हा नंदुरबार एकूण रुपये	**१३ लक्ष**
१०	**अकोला**	अकोट	प्रभाग क्र.८ मधील (उमरा रस्ता म्हणून ओळखला जाणारा) इरफान भाई म्हशीवाले यांच्या घरापासून ते शरद अग्रवाल यांच्या घरापर्यंत कॉंक्रीटीकरण करणे.	१० लक्ष
			जिल्हा अकोला एकूण रुपये	**१० लक्ष**
११	**नांदेड**	मुखेड	अल्पसंख्याक वस्तीमध्ये सी.सी.रस्ते व नाली बांधकाम करणे.	२० लक्ष
			जिल्हा नांदेड एकूण रुपये	**२० लक्ष**
१२	**कोल्हापूर**	जयसिंगपूर	अंतर्गत रस्ते व रस्ता कॉंक्रीटीकरण करणे.	१० लक्ष
			जिल्हा कोल्हापूर एकूण रुपये	**१० लक्ष**
१३	**रत्नागिरी**	राजापूर न.प.	मुसाकाझी रोड ते खलिफे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे.	१० लक्ष
			जिल्हा रत्नागिरी एकूण रुपये	**१० लक्ष**
१४	**गोंदिया**	गोंदिया शहर	गोविंदपूर परिसरात शादीखाना बांधकाम करणे.	१० लक्ष
			जिल्हा गोंदिया एकूण रुपये	**१० लक्ष**
			एकूण रुपये	**२,६३,००,०००/-**
(अक्षरी एकूण रुपये दोन कोटी त्रेसष्ट लक्ष फक्त)				

Dinesh M. Sonavane

Digitally signed by Dinesh M. Sonavane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9cabb099fd0576208f4caa310d2e7860201ab5363a2133e0927ff26c0f016fdf, 2.5.4.45=032100CD9D66225CED8BAE27E0E1249D39EC14A54419D0A13504B49333B23F92B58199, cn=Dinesh M. Sonavane
Date: 2018.03.31 23:03:15 +05'30'

(दि. मा. सोनवणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

शासन निर्णय ,अल्पसंख्याक विकास विभाग क्र. क्षेविका -२०१८ /प्र.क्र. २७ /का.९,
दि. ३१ मार्च , २०१८.
परिशिष्ट - "ब"

उपयोगिता प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, अल्पसंख्याक विकास विभागाने राज्यातील अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रांसाठी कार्यान्वित केलेल्या क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग **क्र. क्षेविका -२०१८ /प्र.क्र. २७ /का.९, दि. ३१ मार्च, २०१८.** अन्वये वितरित केलेला रु. /- (अक्षरी रु.) एवढा निधी पुढील विकासकामांसाठी उपयोगात आणला आहे :-

विकासकाम/ विकासकामे	वापरलेली रक्कम
अ.	रु.
ब.	रु.
क.	रु.
ड.	रु.

असेही प्रमाणित करण्यात येते की, क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत ज्या निकष / अटींनुसार शासनाने अनुदान मंजूर केले होते, त्या निकष/ अटींची यथायोग्यरित्या पुर्तता करण्यात आली आहे. तसेच ज्या प्रयोजनाकरिता निधि मंजूर करण्यात आला होता, त्याच प्रयोजनाकरिता निधिचा प्रत्यक्षात विनियोग झाला आहे, याची खातरजमा करण्याकरिता मी खालील दस्तऐवज/अभिलेखांची तपासणी केली आहे :-

तपासणी केलेल्या दस्तऐवज/अभिलेखांचे प्रकार :-

१. प्रमाणक आणि पुस्तक लेखा (Vouchers and Book of Accounts)
२. मोजणी पुस्तके (Measurement Books)
३. सहायक अनुदान / कर्ज नोंदवही (Grant-in-aid/ Loan Register)
४. खर्च नोंदवही (Expenditure Register)

आयुक्त, महानगरपालिका/ मुख्याधिकारी, नगरपालिका यांची स्वाक्षरी	संबंधित महानगरपालिका / नगरपालिका ज्या जिल्हयात स्थित आहेत त्या जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांची प्रतिस्वाक्षरी
नाव तारीख स्थळ कार्यालय मुद्रा	नाव तारीख स्थळ कार्यालय मुद्रा

*****